GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे स्वतःचे वृत्तपत्र.

# साहित्य संमेलनात विदेशातील मराठीचा जागर

## माझी मायबोली आली माहेराला

**दुर्गेश आखाडे**




दोन मराठी माणसं एकत्र आली की तीन मंडळे होतात. एक माझं, दुसरं त्याचं आणि तिसरं दोघांचं... या प्रेरणेतूनच अमेरिकेत पन्नास मराठी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. 'साहित्य संमेलनात विदेशात मराठीचा जागर' या परिसंवादामध्ये अमेरिकेत कार्यरत असणारे साखरपा गावचे सुपुत्र मंदार जोगळेकर बोलत होते. या परिसंवादात विदेशात स्थायिक असलेल्या 'मराठी माणसांचं' मराठीबद्दलचं प्रेम प्रकर्षाने दिसून आलं.

'विदेशातील मराठीचा जागर' या परिसंवादामध्ये कतार येथील हसन चौघुले, सिंगापूर येथील संतोष अंबिके, अमेरिकेमधील मंदार जोगळेकर, लंडनमधील अनिल नेने सहभागी झाले होते. यावेळी चौघुले यांनी कतारमध्ये पाच शाळांमध्ये मराठी शिकवले जाते, असल्याचे सांगितले. संतोष अंबिके यांनी सिंगापूरमध्ये दर दोन महिन्यांनी एक मराठी वार्तापत्र प्रसिद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

> लंडनमध्ये रहाणारे अर्थतज्ज्ञ वर्षे मी इंग्लंडमध्ये रहातोय त्यामुळे आजकाल मराठी भाषेत बदललेले शब्द आणि त्याचे अर्थ आम्हाला कळत नाहीत. 'काय गळका पाऊस आहे, काय सही आहे, कसला फंडा आहे, हे शब्दप्रयोग आमच्यासाठी नवीन आहेत.
>
> **- अनिल नेने, अर्थतज्ज्ञ**

### बुक डॉट कॉम वेबसाईट

बुक डॉट कॉम ही वेबसाईट सुरू करून अनेक मराठी पुस्तके जगभर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. अमेरिकेत 'एकता' हे मासिक सुरू असल्याचचे मंदार जोगळेकर यांनी सांगितले.